**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १३/०४/२०२५ (रविवार)**

---

## उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत एम.एम.पी.कंपनी धुरखेडा येथे झालेल्या स्पोटाबाबत DISH चा प्राथमिक अहवाल प्राप्त , ३ आरोपी निष्पन्न

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ११/०४/२०२५ रोजी उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत धुरखेडा येथीलएम.एम.पी. या कंपनीमध्ये स्पोट झाला होता. सदर प्रकरणी उमरेड पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक २६४/२०२५ गुन्हा नोंद केला आहे

घटने दिवशी औदयोगिक सुरक्षा व आरोग्य विभाग Directorate of Industrial Safety and Health (DISH) चे अधिकारी, यांनी बारकाईने घटनास्थळाचे निरीक्षण केले होते. त्यांच्या कडुन प्राप्त प्रथामिक अहवालामध्ये कारखाना कायदा ( Factories Act) चे कलम 7 (A), कलम 40, कलम 38 अन्वये प्रथमदर्शनी त्रृटया आढळल्या आहे. या आधारावर कपंनी मॅनेजमेंट चे तीन वरीष्ठ अधिकारी यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.त्यामुळे **१. तेन्नेटी नरसिंग मुर्ती,वय ५६ वर्षे, ( जनरल मॅनेजर एम.एम.पी कंपनी ), २. रमण रामचंद्र भाजीपाले, वय ५० वर्षे, (सेफ्टी ऑफिसर, एम.एम.पी कंपनी), ३. अमित शंकरराव बचाले, वय ३८ वर्षे, ( शिफ्ट मॅनेजर एम.एम.पी कंपनी)** यांना आरोपी करण्यात आले आहे. औदयोगिक सुरक्षा व आरोग्य विभाग (DISH) यांचा अंतीम अहवाल प्राप्त व्हायचा असुन अंतीम अहवालावरून सदर गुन्हयात अजुन आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १२/०४/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा टेकडी शिवार, कन्हान येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे **१) माणिक शामराव भोवते,वय ५५ वर्षे,२) गिरीधर हरीभाउ होले वय ४५ वर्षे,३) अषोक भाददुजी हुड वय ५७ वर्षे रा.टेकाडी, ४) लहु विक्रम नाईक वय ४० वर्षे, ५) राहुल महादेव हुड वय ३३ वर्षे रा.टेकाडी,६) गौरव श्रावण गवळी वय २१ वर्षे सर्व रा. टेकाडी हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. पोलीसांना पाहुन आरोपी क्र ७) पॅशन मोटार सायकल क्र.एम एच ४० एम ८४३८ चा चालक आणि ८) हिरो स्प्लेंडर चेसीस क्र.एम.बी.एल.एच.ए.आर.०७३जे.एच.ए.७१२८५ चा चालक** पळुन गेले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते , रोख रक्कम, ३ मोटर सायकल आणि ६ मोबाईल फोन असा एकुण किंमती १,६०,७९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद ८ आरोपीतांविरूध्द कलम १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने